# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ

क्र. रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४८/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९ जानेवारी, २०२६

प्रति,
जिल्हाधिकारी,
रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर,
कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशीव व लातूर.

विषय:- जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक - २०२६ निवडणुकीकरिता वाहने अधिग्रहीत करणे, त्याबाबतचा खर्च भागवणे, निधी उपलब्ध करून देणे.

संदर्भ:- १. शासन आदेश क्र.जिपनि-२०२५/प्र.क्र.११७/पंरा-२, दि. ०१/१०/२०२५
२. शासन आदेश क्र.जिपनि-२०२६/प्र.क्र.११/ई-१५३३२०६/पंरा-२, दि. २२/०१/२०२६

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून शासनाने जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी खर्च भागविण्यासाठी जिल्हाधिकारी यांना अनुदान वाटप केले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १९ अन्वये जिल्हाधिकारी यांनी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी वाहने अधिग्रहीत करण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार निवडणुकीसाठी वाहने अधिग्रहीत करावीत व त्यावर होणारा खर्च ग्राम विकास विभागाने निवडणुकीसाठी वितरीत केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

ग्राम विकास विभागाने दि. २२/०१/२०२६ रोजी वितरीत केलेले अनुदान कमी पडत असल्यास ग्राम विकास विभागाच्या दि. २९/०९/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या निकषानुसार त्यांच्याकडे निधीची मागणी करण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेनुसार,

आपला,
२९/०१/२०२६
(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत : प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई ०१ यांना कळविण्यात येते की, संबंधित जिल्हाधिकारी यांना मंजूर केलेला संपूर्ण निधी कृपया एकाच वेळी वितरीत करण्यात यावा.